

# मुमुक्षूसाठी

**योगीराज सद्गुरु श्री घाग महाराज.**

प्रश्न–मनुष्य एखादया कर्माला प्रवृत्त कां होतो ?

उत्तर–प्रथमतः कर्माचे प्रकार पाहू या.

१) श्रेयस– सर्व प्रकारच्या दुःखांपासून मुक्तता होऊन परब्रह्म-परमानंद प्राप्तीसाठी करावीं लागणारी व केली जाणारी ती श्रेयस कर्मे.

२) प्रेयस–लौकीक सुखासाठी किंवा स्वर्ग सुखासाठी केली जाणारी ती प्रेयस, अज्ञानी पुरुषास प्रिय असणारी ती प्रेयस कर्मे.

श्रेयस वा प्रेयस कर्माला मनुष्य कां प्रवृत्त होतो याचे उत्तर देणे; म्हणजे विश्व कशासाठी निर्माण झाले वा केले गेले या प्रश्नास उत्तर देण्यासारखे अवघड आहे.

मनुष्य त्याच्या शुभ वा अशुभ कर्मांची फळे भोगण्यासाठी विशिष्ट कर्माला प्रवृत्त होतो व त्या कर्मांची फळे भोगतो. परंतु पूर्वीच्या कर्मास तो कां प्रवृत्त झाला? ज्याचे फळ त्याला भोगावे लागते हा प्रश्न या उत्तरातून पुन्हां निर्माण होतो. असाच विचार केल्यास सर्व प्रथम कर्मास मनुष्य कां प्रवृत्त झाला ? ज्याचे कारण त्याला पुढील अनेक जन्म घ्यावे लागतात. हा प्रश्न शिल्लक रहातो.

परमेश्वराने, त्या पुराण पुरुषाने संकल्पाने हे ब्रह्मांड निर्माण केले त्याबरोबर माया निर्माण झाली.

परमेश्वराने मनुष्यास मन, विवेक, बुद्धि व अहंकार इत्यादि इंद्रिये दिली व त्याद्वारे होणाऱ्या कृती साक्षीरुपाने तो परमात्मा पहात असतो.

मन, बुद्धि व अहंकारामुळे मायेच्या आधीन होऊन मनुष्य त्या परमात्म्याच्या स्वस्वरुपाला विसरुन या कर्माच्या गतीमुळे निर्माण होणाऱ्या जन्म-मृत्यूच्या चक्रात सापडला आहे व बाह्य विषयांनी आकर्षित झाल्यामुळे निरनिराळ्या नवीन नवीन कर्मात व त्यांच्या फळांत अडकतो. त्याचे कारण तो स्वतः स्वस्वरुपास विसरतो आणि सुख-दुःखाच्या चक्रात सापडतो. जेव्हां त्याला कोणी सद्गुरु प्राप्त होतो व त्याचे स्वतःचे स्वरुप त्याला समजावून देतो तेव्हां तो प्रेयस कर्म टाळून श्रेयस कर्मेच करतो व पुन्हां स्वस्वरुपास प्राप्त होतो.

# ० मुमुक्षूसाठी ०

**प्रश्न** : श्रद्धा म्हणजे काय?

**उत्तर :** श्रद्धा व अंधश्रद्धा यांमध्ये निश्चित सिमारेषा दिसत नसली तरी, अंधश्रद्धेपेक्षा डोळस श्रद्धा व्यक्तिच्या विकासास कारणीभूत होते.

एकाची श्रद्धा ती दुसऱ्याची अंधश्रद्धा होऊ शकते, परंतू श्रद्धेशिवाय कांहीच प्राप्त होत नाही.

श्रद्धा म्हणजे अत्यंत विश्वास! विश्वासाशिवाय आपण कार्य करुच शकत नाही.

साधे डोक्याचे केस कापावयाचे असतील तर आपण आपले डोके वस्तराधारी न्हाव्यापुढे विश्वासानेच देतो. तो आपले केसच कापील; आपली मान कापणार नाही असा विश्वास तेथे असतो. तेव्हां श्रद्धा म्हणजे विश्वास. ती डोळस असावी. चांगल्यावर असावी.

**प्रश्न** : उपवास कां करावेत ?

**उत्तर** : हिंदू संस्कृतीत उपवासांस धार्मिक महत्त्व दिलेले आहे. परंतु इतर संस्कृतीतही उपवास के ; जातात. आध्यात्मिक उपचार म्हणून उपवास केल ास माणसिक तसेच शारिरीक फायदे मिळतात. उपवास नें शरीरातील पचनेंद्रियांना आराम मिळून त्यांचे आर ग्य टिकवले जाते. रससाम्यात्व राखले जाते त्याचबर बर मनावर पवित्रतेचे संस्कार होतात.

अन्नमय शरीराचे शुद्धिकरण उपवास होते त्याच बरोबर प्राणमय शरीराचे शुद्धिकरण होते. शरीराला आलेले जडत्व उपवासानेंच कमी करता येते. परंतू उपवास म्हणजे फराळाचे खाऊन उपवास करणें नव्हे. अन्न सेवन न करता केलेले उपवासच उपरोक्त फायदे मिळवून देतात हे लक्षांत ठेवावे. अन्न बदलामुळे उपवासाचे फायदे मिळत नाहीत.

**प्रश्न** : मनाची शांतता कशावर अवलंबून आहे ?

**उत्तर** : समुद्र नेहमी भरलेला असूनही शांत असतो. समुद्रांत जशा नद्या प्रवेश करतात, त्याप्रमाणे इच्छांचा प्रवाह सतत वहात असतांना जो मनुष्य क्षुब्ध होत नाही. त्यालाच शाती मिळते. या उलट सर्व प्रकारच्या इच्छां तृप्त करण्याकरीता जो झगडतो त्याला शांती लाभत नाही.

ज्यांने इंद्रिय तृप्तीकरिता असणाऱ्या सर्व इच्छांचा त्याग केला आहे. जो इच्छांपासून मोकळा झालेला आहे, ज्याने मालकीच्या किंवा ममतेच्या भावनांचा त्याग केला आहे आणि ज्याच्या ठिकाणी अहंकार नाही असांच मनुष्य खरी शांती प्रांप्त करु शकतो.

**प्रश्न** : साधु स्वतःला लोकांपासून जनसाधारणांपासून अलिप्त राखतात याचे कारण काय ?

**उत्तर** : साधनेच्या विभिन्न मार्गासंबंधी सगळ्या गुढ गोष्टीविषयी बोलण्याने लोकांचे नुकसान होते. म्हणुन ज्या मार्गावर आपण आहोत तेथे दृढता व स्थिरता कशी निर्माण होंते पाहिलं पाहिजे. कोणत्याहि मार्गावरुन एकाग्रतेनें आणि तळमळीनें गेलांत की ती वाट निश्चीत इश्वराकडेच नेंते, या उलट लोकांच्या सानिध्यांत राहिल्यानें लक्ष विचलीत होण्याची शक्यता असते.

**प्रश्न** : समाजात असलेले गुंड-पुंड लोक सर्व मान-सन्मान व ऐहीक सुखे इ. उपभोगतांना दिसतात. हे असेच चालले तर सामान्य माणसाचा सत्कर्मावरचा विश्वास उडेल तर आपणांस काय वाटते?

**उत्तर** : कृतकर्माचे प्रायश्चित हे मिळालेच पाहिजे, असा ईश्वरी न्याय आहे. ईश्वराची इतक्या सहज फसवणूक होत नाही. रक्तानें माखलेली संपत्ती संपादन करुन तिचे डाग दान धर्मानें व देवाचे देव्हारें माजवल्याने धुवून निघतात, या भ्रामक समजुतीनेच जगात आजवर किती तरी अन्यायाची व पापांचीं निपज झालेली आहे. परंतू केलेले पाप कर्त्याचा बळी घेतल्याशिवाय रहात नाही. हे अढळ सत्य आहे; वाटेल त्या दुराचारानें लक्षाधिश झालेल्या लोकांना, कोटद्यावधिच्या दान धर्मानेंहि समाधान मिळत नाही. गरीबांची हत्या व शाप हे त्यांचीहि हत्या केल्याशिवाय त्यांची पाठ सोडीत नाहीत.